॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# North Maharashtra University, Jalgaon

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २८ ( ) महाराष्ट्रातील सर्व अकृषि विद्यापीठांच्या बृहत आराखडयांमध्ये आवश्यक दुरुस्त्या करुन अंतिम स्वरुप देण्यासाठी राज्यातील विविध विद्यापीठांच्या प्र-कुलगुरुंच्या दोन दिवसीय बैठकीला आज पासून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात प्रारंभ झाला.

महाराष्ट्रातील सर्व अकृषि विद्यापीठांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ या कालावधीसाठी पंचवार्षिक बृहत आराखडा शास्त्रशुध्द पध्दतीने करण्यासंदर्भात राज्य शासनाने सूचित केले होते. त्यासाठी राज्यस्तरीय विद्यापीठीय पंचवार्षिक बृहत आराखडा छाननी व पूनर्तपासणी तज्ज्ञ समिती माजी कुलगुरु डॉ.के.बी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आली आहे. या समितीच्या सदस्यांनी यापूर्वी काही बैठका घेऊन सर्व अकृषि विद्यापीठांशी संवाद साधला. नागपूर येथे १८ व १९ जुलै रोजी सर्व विद्यापीठांनी बृहत आराखडयांचे सादरीकरण केले होते. या सादर केलेल्या बृहत आराखडयामध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करुन अंतिम स्वरुप देण्यासाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

समिती अध्यक्ष डॉ.के.बी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत श्री.अनिल राव, डॉ.बी.एन.जगताप, श्री.आनंद मापूसकर यांनी आज राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, मुंबई विद्यापीठ, एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ, मुंबई, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या सहा विद्यापीठांच्या प्रतिनिधींशी संवाद साधून त्यांनी सादर केलेल्या बृहत आराखडयाबाबत चर्चा केली.

ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या आठवडयात पुणे येथे या बृहत आराखडयाला मंजूरी देवून अंतिम मसुदा माहेडकडे सादर केला जाणार असल्याची माहिती श्री.अनिल राव यांनी या बैठकीत दिली. आजच्या या बैठकीसाठी मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरु प्रा.आर.डी.कुलकर्णी, एस.एन.डी.टी.चे प्र-कुलगुरु प्रा.व्ही.एन.मगरे, अमरावतीचे प्र-कुलगुरु डॉ.आर.एस.जयपूरकर, औरंगाबादचे प्र-कुलगुरु डॉ.अशोक तेजनकर तसेच नागपूर येथील डॉ.विनायक देशपांडे, कोल्हापूर येथील प्रा.पी.डी.राऊत उपस्थित होते. याशिवाय डॉ.मुरलीधर कुऱ्हाडे, डॉ.अजय भंबारे, डॉ.श्रीकांत कोमावार, डॉ.सचिन त्रिपाठी, डॉ.सुलभा पाटील, डॉ.अर्चना भटनागर, डॉ.गणेश मगर, डॉ.नितीन वाणी, विष्णू कराळे, गणेश खरात, सचिन चव्हाण, सागर बांदल आदी उपस्थित होते. उदया उर्वरित पाच विद्यापीठांचे सादरीकरण होणार आहे. आजच्या या बैठकीत उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव भ.भा.पाटील, जळगाव विभागाचे शिक्षण सहसंचालक डॉ.केशव तूपे हे देखील उपस्थित होते.

---

जा.क्र: उमवि/१६/ हस्तदेय /२०१८ — दिनांक : २८ जुलै, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी